# ५.

# गुणनियंत्रण प्रयोगशाळा, गोरेगांव, मुंबई

पशुसंवर्धन माहिती पुस्तिका

## ५. उपायुक्त पशुसंवर्धन, गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे कॉलनी, गोरेगाव, मुंबई -६५

गुण नियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव, (पूर्व) मुंबई-६५ ही संस्था महाराष्ट्र शासनाने खात्याच्या १९८४ च्या पुनर्रचनेत पशुपोषण संशोधन केंद्र व गुणनियंत्रण प्रयेगशाळा, आरे, गोरेगाव, (पूर्व) मुंबई-६५ अशी जोड योजना मान्य करून उपसंचालक, पशुसंवर्धन गुणनियंत्रण प्रयोगशाळा यांना या संस्थेचे कार्यालय प्रमुख म्हणून घोषित केले आहे. पशुपोषण संशोधन अधिकारी हे पद सहकारी अधिकारी म्हणून कार्यरत राहीले. त्याचदरम्यान सूक्ष्मजीव शास्त्रवेत्ता हे उपसंचालक दर्जाचे तिसरे पद ही निर्माण करण्यात आले.

महाराष्ट्र शासन निर्णय, क्र. आस्था./१०७५/६५३५/एडीएम, दिनांक १४ एप्रिल १९७७ अन्वये परदेशी निर्यात करावयाचे गोठीत म्हशीचे मांस, शेळी-मेंढीचे मांस व शवे उबवणूकीची व खाण्याची अंडी आणि संकीर्ण पशुजन्य खाद्यपदार्थाचे नमुन्याचे हे परोपजीवी, सूक्ष्मजीवी व जैवीक तपासणीचे काम गुणनियंत्रण प्रयोगशाळा, गुण नियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव, (पूर्व) मुंबई-६५ याठिकाणी करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार डायरेक्टर जनरल ऑफ फॉरेन ट्रेड, मिनिस्ट्री ऑफ कॉमर्स यांची अधिसूचना क्रमांक/इटीसी/(पिन) ९२/९७, दिनांक ३१ मार्च ९३ नुसार मांस व पशुजन्य पदार्थाच्या चाचण्या घेऊन आरोग्य दाखले या संस्थेकडून दिले जातात.

शासन निर्णय, संकीर्ण/१०/२००२/प्र.क्र.४९/कृषी पदुम/मंत्रालय, दिनांक २२ जानेवारी २००३ अन्वये मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाकडे असलेले मानवी खाद्यासाठी उपयोगात आणले जात नाहीत अशा पशुजन्य व अखाद्य (नॉन इडीबल) उत्पादित पदार्थाच्या नमुना तपासणीचे कामदेखील गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव, (पूर्व) मुंबई-६५ यांच्याकडे वर्ग करण्यात आले. घातक रोग देशात येऊ नयेत म्हणून आयात केलेले पशु व पशुजन्य पदार्थांचे जिवाणू, विषाणू परीक्षण, जंत व कृमी परीक्षण इत्यादी कामे करणे गरजेचे आहे. यासाठी राज्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळ व बंदरे याठिकाणी आयात झालेल्या पशु व पशुजन्य पदार्थांचे नमुने संकलीत करून त्यांची तपासणी करण्याचे अधिकार शासन निर्णय, क्र. डी.आय.एस. १०/२००१/२१४१३/प्र.क्र. २१८/पदुम, मंत्रालय, दिनांक ९ ऑगस्ट २००१ अन्वये गुणनियंत्रण प्रयोगशाळा आरे, गोरेगाव, (पूर्व) मुंबई-६५ या संस्थेस प्रदान करण्यात आले आहेत.

खात्याच्या पुनर्रचनेनुसार व शासन निर्णय क्रमांक पसं/प्र./१००१/प्र.क्र. २९ (भाग-४) पदुम-१, मंत्रालय, दिनांक २५ मे २००४ अन्वये उपायुक्त पशुसंवर्धन, गुणनियंत्रण प्रयोगशाळा आरे, गोरेगाव, (पूर्व) मुंबई-६५ यांच्या कार्यालयातील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, मुंबई, सूक्ष्मजीव शास्त्र (उपसंचालक, पशुसंवंर्धन), पशुपोषण संशोधन अधिकारी, पशुपोषण संशोधन केंद्र, आरे, गोरेगाव, (पूर्व) मुंबई-६५, सहाय्यक संचालक, पशुसंवंर्धन, अजंठा रोग निवारण पथक (गुणनियंत्रण प्रयोगशाळा), आरे, मुंबई ही पदे निरास झाल्यामुळे आरोग्य दाखला देण्याचे काम पूर्वीचे उपसंचालक, पशुसंवर्धन गुणनियंत्रण व खात्याच्या पुनर्रचनेनुसार उपायुक्त पशुसंवर्धन, गुणनियंत्रण प्रयोगशाळा, गोरेगाव, मुंबई-६५ हे करीत आहेत. त्यांच्या अनुपस्थितीत वरिष्ठ पशुधन विकास अधिकारी (गुणनियंत्रण प्रयोगशाळा) आरे, मुंबई-६५ हे निर्यात दाखल्यावर सही करीत आहेत. खात्याच्या पुनर्रचनेसंदर्भात नेमलेल्या त्रुटी समितीच्या अहवालानुसार शासन निर्णय, पुरक पत्र क्रमांक पसंत्र. १००४/प्र.क्र. २६२/पदुम/मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ३० जून २००५ गुणनियंत्रण प्रयोगशाळा, प्रयोगशाळा आरे, गोरेगाव, (पूर्व) मुंबई-६५ यांच्या कार्यालयात सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन हे पद समायोजनाने उपलब्ध करून देण्यात आले आहे.

निर्यातदारांचे अर्ज कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर अर्जाप्रमाणे गोठीत मासाचे नमुने, संकीर्ण, अखाद्य पदार्थ, अंडी असे वर्गीकरण केले जाते. तसेच कार्टन संख्या, कार्टनचे सरासरी वजन, माल कोणत्या देशात निर्यात होणार इत्यादी माहितीबाबत खात्री केली जाते. गोठीत मांसाचे नमुनेसंदर्भात सोबतची इतर कागदपत्रे तपासून परत केली जातात. अर्ज तपासणी नंतर उपायुक्त पशुसंवंर्धन, गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव यांच्या आदेशानुसार पशुधन विकास आधिकारी हे निर्यातदाराच्या कंपनीस भेट देवून प्रत्यक्ष भेटीत शीतगृहाचे तापमान पहाणे, प्रोसेसिंग प्लांटची स्वच्छता व प्रक्रिया पहाणे, कार्टन क्रमांक व पॅकिंग, मालाचा साठा इत्यादी बाबींची पहाणी व मार्गदर्शन इत्यादी कामे करतात. त्यानंतर रॅन्डम पध्दतीने कार्टनचे नमुने गोळा करून परोपजीवी, सूक्ष्मजीवी व जैवीक तपासणीकरिता गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव येथे आणले जातात.

**परोपजीवी चाचणी :**

सदर तपासणीत गोठीत मांसास पूर्व स्थितीत आणून त्यामध्ये परोपजीवी सीस्ट शोधल्या जातात व त्यात परोपजीवी सीस्ट नसल्याची खात्री केली जाते.

**सूक्ष्मजीव तपासणी :**

प्रयोगशाळेत नमुने तपासणीसाठी आणल्यानंतर केंद्र शासनाच्या निर्यातीच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे व ठरवून दिलेल्या भारतीय प्रमाणकानुसार सूक्ष्मजीवी तपासणी केली जाते. सदर तपासणी प्रामुख्याने एकूण सूक्ष्मजीव संख्या १ ते १० दशलक्ष पर्यंत प्रती ग्रॅम, इकोलाय-१०० प्रती ग्रॅम, सालमोनेल्ला-शुन्य. इत्यादीबाबत चाचण्या घेतल्या जातात. नमुन्यामधून १० ग्रॅम पदार्थ घेऊन विविध डायल्युशन पध्दतीने अनेक आगार प्लेटवर वाढविले जाते. त्यानंतर २४ व ४८ तासांचे निरीक्षण करून त्यांच्या नोंदी घेतल्या जातात आणि त्या नोंदीनुसार ते पदार्थ खाण्यास योग्य आहेत अथवा नाहीत हे ठरविले जाते. सूक्ष्मजीवांची पेट्रीडीशमधील मिडीयावर वाढ झालेल्या कॉलनीची मोजणी केली जाते. वर नमूद केलेल्या प्रमाणकापेक्षा जास्त कॉलनीची वाढ असल्यास संबंधीत कंपनीस कळविले जाते. पॅरलल पशुधन नमुने पुन्हा परोपजीवी, सूक्ष्मजीवी व जैवीक तपासणीकरिता गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव येथे आणले जातात व पॅरलल नमुन्यास तपासणी केली जाते. या तपासणीसाठी निर्यातदाराकडून नवीन सेवा शुल्क घेतले जात नाही. पॅरलल नमुन्यासदेखील प्रयोगशाळा तपासणीमध्ये ठरवून दिलेल्या प्रमाणकापेक्षा जास्त सूक्ष्मजीव आढळल्यास सदरच्या नमुन्यास निर्यातीसाठी अयोग्य ठरवून आरोग्य दाखला देण्याचे नाकारण्यात येते.

**जैविक तपासणी :**

सूक्ष्मजीव तपासणी नमुन्याच्या प्रक्रियेच्या वेळी तयार केलेले द्रावण हे पांढ-या उंदरामध्ये टोचले जाते. टोचलेले उंदीर ७२ तासानंतर जीवंत असल्याची खात्री केल्यानंतर ॲन्थ्रॅक्स नसल्याचा आरोग्य दाखला दिला जातो. अशाप्रकारे सूक्ष्मजीव जंतू, परोपजीवी, सूक्ष्मजीवी व जैवीक तपासणीमध्ये प्रमाणकात दर्शविल्याप्रमाणे खात्री करूनच निर्यातक्षम मांस व पशुजन्य पदार्थ निर्यातीसाठी योग्य असल्याचा आरोग्य दाखला गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे यांचेकडून दिला जातो.

याव्यतिरीक्त पशुधन विकास अधिकारी हे प्रयोगशाळेच्या दैनंदिनी कामकाजाचा तांत्रिक पत्र व्यवहार करणे, साहित्य, मिडीया, खाद्य खरेदी करणे व त्यासंबंधी संबंधीत नोंदवहीत नोंद करणे, प्रयोग शाळेतील बहुतांश उपकरणे वीजेवर चालतात. त्यामुळे उपकरणे दैनंदिन देखभाल करणे, डिस्टील वॉटर तयार करणे, नादुरुस्त उपकरणे दुरुस्त करणे यासारखी जिकरीची कामे करतात. वर्ग ४ च्या कर्मचा-यांकडून प्रयोगशाळा स्वच्छता, फ्युमीगेशन, उंदरांचे खाद्य व साफसफाई इत्यादी कामे केली जातात. जागतीक बाजारपेठेत भारतीय मालाची निर्यात वाढल्यामुळे दिवसेंदिवस मांसजन्य व इतर संकीर्ण पशुजन्य पदार्थ व अखाद्य पदार्थांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी येण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे त्यांची तपासणी करताना योग्य गुण व प्रत यावर नियंत्रण राखण्यासाठी व प्रयोगशाळेचा दर्जा टिकविण्यासाठी प्रयोगशाळेचे अत्याधुनिकीकरण, नूतनीकरण व बळकटीकरण करण्यात येत आहे. सद्यस्थितीत कर्मचारी/अधिकारी संख्या अपुरी असल्याने अतिरिक्त कर्मचारी/अधिकारी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील ८ पशुवैद्यकीय दवाखाने बंद करण्यात आले आहेत. मात्र जनावरे असल्याने व खात्याकडून रोगप्रतिबंधक लसीकरणासह पशुआरोग्यविषयक व तांत्रिक बाबी इत्यादीसंबंधी माहिती या कार्यालयाकडून मागविली जाते तरी पूर्ववत किंवा कमीतकमी ५ पशुवैद्यकीय दवाखाने स्टाफसह मंजुरी देऊन सुरू करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

♦ ♦ ♦

## मागील १७ वर्षात गुण नियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव (पूर्व) मुंबई –६५ येथे तपासणी केलेल्या नमुन्यांचा व महसुलाचा तपशील

| Item | 1995-96 | 1996-97 | 1997-98 | 1998-99 | 1999-00 | 2000-01 | 2001-02 | 2002-03 | 2003-04 | 2004-05 | 2005-06 | 2006-07 | 2007-08 | 2008-09 | 2009-10 | 2010-11 | 2011-12 (upto June) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Frozen Buffalo Meat. | 1329 | 1555 | 1647 | 1554 | 1462 | 1230 | 799 | 840 | 949 | 1161 | 908 | 615 | 631 | 839 | 1614 | 2005 | 550 |
| Frozen Sheep Meat. | 75 | 75 | 69 | 73 | 79 | 67 | 06 | ------- | 14 | 23 | 27 | 1 | -- | 1 | 13 | 25 | 4 |
| Eggs | 238 | 236 | 258 | 284 | 216 | 299 | 252 | 184 | 230 | 202 | 184 | 130 | 106 | -- | -- | 12 | 14 |
| Other | 24 | 44 | 51 | 48 | 51 | 116 | 220 | 559 | 843 | 977 | 1059 | 1474 | 1877 | 2574 | 2073 | 5284 | 1126 |
| Total | 1666 | 1910 | 2025 | 1759 | 1859 | 1712 | 1277 | 1583 | 2036 | 2363 | 2178 | 2220 | 2614 | 3414 | 2774 | 7326 | 1694 |
| Ave. / Month | 139 | 159 | 169 | 147 | 159 | 143 | 106 | 132 | 170 | 197 | 182 | 185 | 218 | 285 | 555 | 611 | 549 |
| Revenue-lakhs | 8.302 | 15.24 | 47.62 | 48.1 | 49.69 | 80.13 | 154.72 | 157.52 | 188.24 | 238.25 | 186.87 | 140.01 | 152.94 | 164.85 | 282.1 | 361.4 | 88.57 |

# WARDWISE DETAIL ANIMAL CENSUS - Mumbai Suburban

| Sr. No. | Name of Ward | No. of Houses | No. of Families | Families- with animals | Cattle | Buffaloes | Bovines | Sheep | Goats | Horses | Ponies | Mules | Donkeys | Camels | Pigs | Total Livestock | Dogs | Rabbits | Poultry |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | A | 28136 | 30330 | 547 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 610 | 3 | 236 |
| 2. | B | 22530 | 22513 | 193 | 0 | 0 | 0 | 6 | 195 | 10 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 211 | 103 | 12 | 250 |
| 3. | C | 2981 | 39624 | 359 | 423 | 0 | 423 | 8 | 55 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 486 | 331 | 55 | 208 |
| 4. | D | 93045 | 94773 | 1325 | 0 | 0 | 0 | 5 | 97 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 102 | 1663 | 0 | 0 |
| 5. | E | 3971 | 84830 | 796 | 0 | 0 | 0 | 3 | 55 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 58 | 421 | 3 | 7 |
| 6. | F South | 33917 | 85799 | 1251 | 0 | 0 | 0 | 0 | 72 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 90 | 831 | 0 | 0 |
| 7. | F North | 97951 | 123011 | 1509 | 7 | 0 | 7 | 9 | 147 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 163 | 3376 | 50 | 1689 |
| 8. | G South | 6907 | 81182 | 1482 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 843 | 36 | 1436 |
| 9. | G North | 85848 | 161811 | 905 | 0 | 0 | 0 | 7 | 474 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 481 | 1503 | 22 | 1645 |
| | **Total** | **375286** | **723873** | **8367** | **430** | **0** | **430** | **38** | **1097** | **25** | **0** | **0** | **0** | **0** | **3** | **1593** | **9681** | **181** | **5471** |
| | **Grand Total** | **1129353** | **2709924** | **38969** | **1808** | **23197** | **25005** | **154** | **6535** | **102** | **0** | **4** | **6** | **0** | **545** | **32351** | **30752** | **552** | **35003** |

# WARDWISE DETAIL ANIMAL CENSUS - Mumbai Suburban

| Sr. No. | Name of Ward | No. of Houses | No. of Families | Families-with animals | Cattle | Buffaloes | Bovines | Sheep | Goats | Horses | Ponies | Mules | Donkeys | Camels | Pigs | Total Livestock | Dogs | Rabbits | Poultry |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | H East | 66374 | 101262 | 1316 | 0 | 401 | 401 | 0 | 114 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 515 | 985 | 25 | 862 |
| 2 | H West | 23876 | 90955 | 2222 | 94 | 1038 | 1132 | 15 | 217 | 3 | 0 | 4 | 0 | 0 | 32 | 1403 | 2026 | 29 | 910 |
| 3 | K East | 35486 | 198416 | 2587 | 60 | 626 | 686 | 0 | 0 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 689 | 2360 | 0 | 1701 |
| 4 | K West | 11089 | 145274 | 3616 | 93 | 6138 | 6231 | 0 | 329 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 6565 | 2938 | 5 | 854 |
| 5 | L | 104761 | 124716 | 1108 | 1 | 0 | 1 | 0 | 42 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 43 | 915 | 22 | 675 |
| 6 | M East | 139331 | 141065 | 2616 | 46 | 161 | 207 | 4 | 1497 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1708 | 844 | 56 | 4596 |
| 7 | M West | 69014 | 84614 | 1005 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1025 | 15 | 1225 |
| 8 | N | 106467 | 149432 | 1108 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 291 | 4 | 0 |
| 9 | P South | 6632 | 130078 | 1762 | 145 | 8766 | 8911 | 3 | 258 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 9172 | 1480 | 15 | 3925 |
| 10 | P North | 8335 | 153416 | 3690 | 197 | 2148 | 2345 | 60 | 1663 | 40 | 0 | 0 | 6 | 0 | 25 | 4139 | 1673 | 109 | 4331 |
| 11 | R Central | 9069 | 150737 | 1984 | 154 | 1555 | 1709 | 1 | 115 | 24 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1849 | 1759 | 31 | 2399 |
| 12 | R South | 5012 | 144515 | 2951 | 3 | 407 | 410 | 11 | 168 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 73 | 662 | 1089 | 9 | 1671 |
| 13 | R North | 5762 | 110685 | 1198 | 189 | 1325 | 1514 | 0 | 67 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1581 | 1110 | 12 | 1452 |
| 14 | S | 133420 | 172583 | 2458 | 140 | 521 | 661 | 22 | 869 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 398 | 1952 | 1761 | 34 | 3917 |
| 15 | T | 29439 | 88303 | 981 | 256 | 111 | 367 | 0 | 99 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 14 | 480 | 815 | 5 | 1014 |
| | **Total** | **754067** | **1986051** | **30602** | **1378** | **23197** | **24575** | **116** | **5438** | **77** | **0** | **4** | **6** | **0** | **542** | **30758** | **21071** | **371** | **29532** |